Vol III Issue III April 2013

Impact Factor : 0.2105

ISSN No : 2230-7850

## Monthly Multidisciplinary Research Journal

# *Indian Streams Research Journal*

Executive Editor

Ashok Yakkaldevi

Editor-in-chief

H.N.Jagtap

**IMPACT FACTOR : 0.2105**

**Welcome to ISRJ**

**RNI MAHMUL/2011/38595** **ISSN No.2230-7850**

Indian Streams Research Journal is a multidisciplinary research journal, published monthly in English, Hindi & Marathi Language. All research papers submitted to the journal will be double - blind peer reviewed referred by members of the editorial Board readers will include investigator in universities, research institutes government and industry with research interest in the general subjects.

## International Advisory Board

Flávio de São Pedro Filho
Federal University of Rondonia, Brazil

Kamani Perera
Regional Centre For Strategic Studies, Sri Lanka

Janaki Sinnasamy
Librarian, University of Malaya [ Malaysia ]

Romona Mihaila
Spiru Haret University, Romania

Delia Serbescu
Spiru Haret University, Bucharest, Romania

Anurag Misra
DBS College, Kanpur

Titus Pop

Mohammad Hailat
Dept. of Mathmatical Sciences, University of South Carolina Aiken, Aiken SC 29801

Abdullah Sabbagh
Engineering Studies, Sydney

Catalina Neculai
University of Coventry, UK

Ecaterina Patrascu
Spiru Haret University, Bucharest

Loredana Bosca
Spiru Haret University, Romania

Fabricio Moraes de Almeida
Federal University of Rondonia, Brazil

George - Calin SERITAN
Postdoctoral Researcher

Hasan Baktir
English Language and Literature Department, Kayseri

Ghayoor Abbas Chotana
Department of Chemistry, Lahore University of Management Sciences [ PK ]

Anna Maria Constantinovici
AL. I. Cuza University, Romania

Horia Patrascu
Spiru Haret University, Bucharest, Romania

Ilie Pintea,
Spiru Haret University, Romania

Xiaohua Yang
PhD, USA

Nawab Ali Khan
College of Business Administration

## Editorial Board

Pratap Vyamktrao Naikwade
ASP College Devrukh,Ratnagiri,MS India

R. R. Patil
Head Geology Department Solapur University, Solapur

Rama Bhosale
Prin. and Jt. Director Higher Education, Panvel

Salve R. N.
Department of Sociology, Shivaji University, Kolhapur

Govind P. Shinde
Bharati Vidyapeeth School of Distance Education Center, Navi Mumbai

Chakane Sanjay Dnyaneshwar
Arts, Science & Commerce College, Indapur, Pune

Awadhesh Kumar Shirotriya
Secretary, Play India Play (Trust),Meerut

Iresh Swami
Ex - VC. Solapur University, Solapur

N.S. Dhaygude
Ex. Prin. Dayanand College, Solapur

Narendra Kadu
Jt. Director Higher Education, Pune

K. M. Bhandarkar
Praful Patel College of Education, Gondia

Sonal Singh
Vikram University, Ujjain

G. P. Patankar
S. D. M. Degree College, Honavar, Karnataka

Maj. S. Bakhtiar Choudhary
Director,Hyderabad AP India.

S.Parvathi Devi
Ph.D.-University of Allahabad

Sonal Singh

Rajendra Shendge
Director, B.C.U.D. Solapur University, Solapur

R. R. Yalikar
Director Managment Institute, Solapur

Umesh Rajderkar
Head Humanities & Social Science YCMOU, Nashik

S. R. Pandya
Head Education Dept. Mumbai University, Mumbai

Alka Darshan Shrivastava
Shaskiya Snatkottar Mahavidyalaya, Dhar

Rahul Shriram Sudke
Devi Ahilya Vishwavidyalaya, Indore

S.KANNAN
Ph.D , Annamalai University,TN

Satish Kumar Kalhotra

**Address:-Ashok Yakkaldevi 258/34, Raviwar Peth, Solapur - 413 005 Maharashtra, India**
**Cell : 9595 359 435, Ph No: 02172372010 Email: ayisrj@yahoo.in Website: www.isrj.net**

Indian Streams Research Journal
Volume 3, Issue. 3, April. 2013
**ISSN:-2230-7850**

Available online at www.isrj.net

ORIGINAL ARTICLE

# *1980 नंतरच्या मराठी कथेतील स्त्रीचित्रण : एक अभ्यास*

वैशाली जिर्तेद्र साठे

सहशिक्षिका न्यु हायस्कुल आणि ज्युनियर कॉलेज वडाळा

***सारांश:***

कथा, वाड.मयप्रकार प्राचीन काळापासून लोकप्रिय आहे. पण त्याला पूर्वी गोष्टी म्हणत. ख—या अर्थाने कथा वाड.मयप्रकार म्हणून इंग्रजाच्या आगमनानंतर तो वेगळेपणाने आला. साधारण हरीभाउ आपटे यांना आद्य मराठी कथाकार मानले जाते. त्यानंतर वा. म. जोशी, वि. सी. गुर्जर, य. गो. जोशी असे अनेक कथाकार आले. ना.सी.फडके, वि.स.खांडेकर, यांनी स्वातंत्र्यापर्यंत कथा वाड.मय प्रकार खूप लोकप्रिय केला. यात आनंदीबाई शिर्के, काशीबाई कानिटकर, गिरीजाबाई केळकर, विभावरी शिरुरकर या स्त्री कथाकारांचा वाटा आहेच. विभावरी शिरुरकरांचा अपवाद सोडता या सर्वांच्या कथेतील स्त्रिया परंपरागत विचार करणा—या, पतीप्रमाणे भारलेल्या आणि मधून मधून स्त्रियांच्या प्रश्नावर चर्चा करणा—या होत्या. त्या परंपरेच्या विरुध्द वागणा—या नव्हत्या. ह्यातील स्त्रियांना आपल्या जीवनासंबंधी अनेक प्रश्न पडत. पण त्याची उत्तरे त्यांना मिळाली तरी आचरणात आणता आली नाहीत. विभागवरी शिरुरकरांच्या कथेतील स्त्री मुलभूत स्वरुपाचे प्रश्न निर्माण करते. बाकीच्यांच्या कथेतील स्त्रिया सुंदर, धीट, विचारी, पुरुषांशी बरोबरीने बोलणा—या फिरणा—या होत्या. तरी स्त्री सौंदर्याचे वर्णन या कथेतून अधिक दिसते.

***प्रस्तावना :***

सन 1960 पर्यंत नवकथा उदयाला आली होती. नवकथेने मराठी कथेला अधिक समृध्द केले. घटनाप्रधानतेकडून कथा मनोविश्लेषणाकडे गेली. 20 व्या महायुध्दानंतर व स्वातंत्र्यानंतर बदलेल्या जीवनशैलीचे, मूल्याचे दर्शन गंगाधर गाडगीळ, दु. भा. भावे, अरविंद गोखले यांच्या कथेतील स्त्री चित्रणातून दिसून येते. मानवी मनाचे, भावभावनांचे, विचाराचे दर्शन त्यांच्या कथेत येते.

1975 ते 1985 हे स्त्री दशक साजरे झाले. या काळात स्त्रीबद्दल एक वेगळा विचार समाजात प्रसृत झाला. मराठी कथेचा विचार केला तर 1975 ते 1985 या काळात मराठी कथेची गती मंदावल्यासारखी झाली. 1990 नंतर तर अनेक कथाकार त्याच त्या विषयावर लिहू लागले. त्यामुळे एक प्रकारच्या मंदीचा काळ आला की काय असे वाटू लागले. दलित कथाकारामध्ये उर्मिला पवार यांनी कष्टकरी स्त्रीचे चित्रण केले आहे. अन्यायाला प्रतिकार करणारी लढाउ दलित स्त्री प्रतिमा त्यांनी रंगवली आहे. त्यांच्याप्रमाणेच या काळात अनेक स्त्री कथाकार पुढे आल्या. स्त्री हा विषय घेवून अनेक लेखकांनी कथा लिहिल्या. स्त्रीचे केवळ सौंदर्य व प्रेम या विषयाभोवतीच चित्रण न करता तिच्याकडे नव्या जाणिवेने लेखक पाहू लागले. मंगला आठल्येकर म्हणतात, स्त्री मनाचा त्यांनी घेतलेला वेध अधिक खोल आहे. त्यामुळे गेल्या मागील दोन दशकात स्त्री कथाकाराचा मोठा प्रभाव कथा साहित्यावर पडलेला दिसतो. आज मराठी कथेत स्त्री कथाकारांच्या कथा अधिक वाचनीय लोकप्रिय आहेत. यात गौरी देशपांडे यांचा क्रमांक वरचा लागतो.

***गौरी देशपांडे :—***

त्यांचे कथासंग्रह आहे हे असे आहे एकेक पान गळावया असे आहेत. स्वयंभू मुक्त अशी स्त्री गौरी देशपांडे यांच्या कथेत येते. ही स्त्री तिच्या इच्छा—आकांक्षा सहजप्रेरणा प्रमाण मानून जगते. स्वतःशी प्रामाणिक असते. हा तिचा जीवन विषयक दृष्टीकोन असतो. म्हणूनच नीती, अनीतीच्या कल्पना समाजभय तिला जाणवत नाही. स्वतःकडे आणि भोवतालकडे बघण्याची तिची दृष्टी निखळ, पारदर्शी असल्याचे जाणवते. स्वतःमधील गुण—दोष अतिशय निखळपणे स्वीकारते. लग्न संस्थेपासून मुक्त असणा—या स्त्रीचे चित्रण त्यांच्या कथांमध्ये येते. बुध्दीमान परंपराभेदक विचार करणा—या स्त्री ने घेतलेले पुरुष सहवासाचे रुप त्याचा अर्थ त्यांच्या कथेत येतो.

***सानिया :—***

यांच्या कथेतील नायिका उच्चशिक्षित, कमावत्या, स्वतंत्र वृत्तीच्या, पटेल तसे वागणा—या मुक्त प्रवृत्तीच्या आहेत. लग्नसंस्थेची चौकट त्या मानत नाहीत तसेच स्त्री चे शरीरनिष्ठ अनुभव, विवाहानंतर अपरिहार्यपणे स्त्रीच्या वाटयाला येणारे मातृत्व यांच्या बद्दलची जाणीव कथांमधून येते. बायकोला आपल्या आवडीचे कार्यक्षेत्र निवडण्याचे हक्क आहे आणि तिला तिच्या रुचीप्रमाणे वागण्याचे स्वातंत्र्य दिले पाहिजे. अशा कुटूंबातील स्त्रियांचे चित्रण यांच्या कथेत आहे. आई—मुलगी यांचे नाते सानिया यांच्या ब—याच कथांमध्ये येते. त्यांच्या कथेतील मुली आपले आयुष्य स्वतःच स्वतंत्रपणे घडवितात. कोणाच्याही आधाराशिवाय राहणा—या स्त्री चे चित्रण त्यांच्या कथेमध्ये येते.

**Title :** *1980 नंतरच्या मराठी कथेतील स्त्रीचित्रण : एक अभ्यास*
**Source:Indian Streams Research Journal [2230-7850 ]** वैशाली जिर्तेद्र साठे **yr:2013 vol:3 iss:3**

*प्रिया तेंडुलकर :—*

ज्याचा त्याचा प्रश्न, असंही, जन्मलेल्या प्रत्येकाला, जावे तिच्या वंशा असे यांचे कथासंग्रह आहेत. वैवाहिक जीवनातील स्त्री चे उद्ध्वस्तपण, घटस्फोटाचा प्रश्न त्यांच्या कथालेखनामध्ये येतो. त्यांच्या कथेतील स्त्री तिला पडलेले प्रश्न सोडविण्यासाठी धडपडते. ती प्रश्नांना सामोरी जाते. प्रश्नप सोडवितांना तिला मनातील उलाढाल सहन करावी लागते. हे सगळे करतांना ती कोणत्या दयेची अपेक्षा करीत नाही. लग्नानंतर माहेरच्या घरामध्ये स्त्रीला थारा मिळत नाही, याचे चित्रण येतेत्र आधुनिक विभक्त कुटूंबामध्ये मुलगा—सून—मुलगी स्वतःच्या उद्योगात मग्न असल्यामुळे कुटुंबातील आई एकटी पडते, याचे चित्रण येते.

*सुनीती आफळे :—*

स्त्री मन व स्त्री समस्या यांभोवती विणलेली नीरस रेखीव कथा आहेत. अनेक कथा स्त्रीकेंद्री आहेत. उदा. नर, मादी, सूड, वेश्या, बाहुल्या, घरटं, तळघर वगैरे. स्त्री प्रश्नांची जाणीव त्यांच्या कथेत येते. परंतू त्यांच्या कथानायिका बंडखोर भूमिका घेत नाहीत. जीवनातील समस्येकडे, ताणतणावाकडे समजूतदारपणे पाहणा—या स्त्रीचे चित्रण कथेत येते. स्त्रीच्या लहान—सहान दु:खाचे चित्रण यांच्या कथेत येते.

*रोहिणी कुलकर्णी :—*

यांनी स्त्रीच्या आत्मजाणिवेचा, अस्मितेचा शोध घेणा—या स्त्री मनाचे चित्रण केले आहे.

*आशा बगे :—*

मारवा, अत्तर, पूजा, ऋतूवेगळे, निसटलेले असे यांचे कथासंग्रह आहेत. बदलत्या कुटुंब व्यवस्थेतील स्त्रीच्या अस्तित्वाचे भान, मध्यमवर्गाची बदललेली मूल्ये, याची जाणीव येते. जाणीव जपणा—या विचार क्षमता असलेल्या स्त्रिया त्यांच्या कथेमध्ये येतात. आपले अस्तित्व जपण्यासाठी या स्त्रिया बंडखोरी करीत नाहीत. आत्मभान असलेल्या सौम्य प्रवृत्तीच्या स्त्रीचे चित्रण यांच्या कथेत येते.

*अंबिका सरकार :—*

स्त्री मनाचे कौटुंबिक जीवनातील स्त्रीचे शल्य यांचे चित्रण यांच्या कथेत येते. हे दु:ख अधिक तीव्र बोलके अधिक धारदार आहे.

आधुनिक स्त्री मनाच्या जाणिवेचे चित्र वसुधा पाटील यांच्या कथेत येते.

*मेघना पेठे :—*

हंस अकेला व आंधळयाच्या गायी हे प्रमुख कथा संग्रह आहेत. मेघना पेठे स्त्री—पुरुष संबंधाबाबत, नीती—अनीतीच्या पलिकडे जावून विचार करतात. त्यांच्या कथेतीत व्यक्तिरेखा त्यांच्यातील भल्या, बु—या गुणांसह व्यक्त होतात. ' आंधळयांच्या गायी ' मध्ये ब—याच कथा नायिकाप्रधन आहेत. नायिकेने केलेले लग्नसंस्था, कुटुंबसंस्था यांची चिकित्सा पुरुषप्रधान कुटुंबामध्ये बहिण भाउ यांच्यात केला जाणारा भेदभाव त्यांच्या कथेत येतो. स्वतःच्या मर्यादाची जाणीव असलेली, इतरांचा विचार करणारी स्त्री त्यांच्या कथेत येते. स्वैर मुक्त जीवन जगणा—या तुसडया, एकारलेल्या स्त्रिया आणि त्याचबरोबर विचार करणा—या स्वतःच्या सामर्थ्याची जाणीव असलेल्या स्त्रियांचे समांतर चित्रण त्यांच्या कथेत येते. आस्था आणि गवारीची भाजी या कथेमध्ये कुटुंबातील गृहिणी आणि लग्न कुटुंबसंस्था नाकारणारी स्त्री अशा दोघींचा समांतर प्रवास उलगडतो. स्त्री चे स्वतंत्र व्यक्तित्व जपणा—या तिच्या विकासाला महत्व देणा—या, कुटुंबसंस्थेतील, विवाहसंस्थेतील सकारात्मक बदलाचे चित्रण त्यांच्या कथेत येते.

*अरूणा ढेरे :—*

यांचे कथासंग्रह अज्ञात झ—यावर, रात्री, कृष्णकिनारा, भगव्या वाटा, मन केले ग्वाही वगैरे.

प्रेम करण्याची स्त्री ची अमर्यादा ताकद, त्यातून येणारा स्त्री शक्तीचे चित्रण यांच्या कथेमध्ये येते. नव्या जुन्या स्त्रियांचे जगणे शोधण्याचा प्रयत्न या कथेतून झालेला आहे. माणूस म्हणून, स्त्री म्हणून काळापासून काही स्वीकारतो—नाकारतो, काही शोषतो आणि गिळून टाकतो. त्यांच्या कथातून अशा खोल रुजलेल्या नात्यांचे चित्रण येते.

स्त्री शक्तीचा विविध अंगानी वेध घेणारे चित्रण यांच्या कथेत येते. पौराणिक, मध्ययुगीन कालखंडातील स्त्रियांनी केलेला संघर्ष आणि त्यातून व्यक्त झालेली स्त्रीची अस्मिता यांचे चित्रण त्यांच्या कथेत येते.

आशा बगे, सानिया, अंबिका सरकार, उर्मिला शिरुर, प्रिया तेंडूलकर, मेघना पेठे यांना मागील दशकातील कथाकार म्हणायला हवे. नव्या स्त्रीच्या भावविश्वाचा वेगवेगळया बाजूंनी आणि आपापल्या व्यक्तिमत्वानुसार अविष्कार केला आहे. स्त्री जीवनाच्या अनोख्या पैलूचे दर्शन यांच्या कथेतून दिसते.

अलिकडील स्त्री कथाकार मात्र पुरुषप्रधान व्यवस्थेत स्त्रीची होणारी घुसमट या एकाच विषयावर लक्ष केंद्रित करीत आहे. असे वाटते.

स्त्रियांच्या जीवनाविषयी नव्या दृष्टीने लेखकांनी पाहिले आहे.

*ह.मो.मराठे :—*

पुरुषी दृष्टीकोनातून स्त्री मनाचे निरीखण यांनी आपल्या कथेतून केले आहे. आज स्त्री अर्थाजनासाठी बाहेर पडते. त्यामुळे घर, कुटुंब, समाज, कार्यालये, त्यातील वृत्ती—प्रवृत्ती व नव्याने उदभवलेल्या समस्या व ताण—तणाव यांच्याखाली सापडून अनेक प्रकारे विदिर्ण होणारे स्त्री मनाचे चित्रण यांच्या कथेत येते. आजच्या पुरुषाला शिकलेली, मिळवती बायको हवी. पण तिच्या कौटुंबिक जबाबदा—यांचा वाटा उचलायला नको. त्यामुळे स्त्री वर पडणारा दुहेरी—तिहेरी भार, त्यात तिची ओढाताण, तिच्या स्वतःच्या नव्या जाणिवा व नवरा, मुले,

सासू–सासरे, आईवडिल यांचा समजूतदारपणाचा अभाव याने स्त्री मन विफल कडवट होते. याचे चित्रण भूमिका, पुरुष, वाल्याकोळी व त्याची बायको अशा अनेक कथेतून येते.  तसेच एकीकडे संसारासाठी धडपडणारी अशी स्त्री, तर दुसरीकडे नालायक, एका जागी बसून खाणारे निष्क्रिय, कोसळलेले, पिचलेले पुरुष यांचे चित्रण येते.

***अरुण साधू :–***

यांच्या कथेतील स्त्रिया पारंपारिकतेला शरण न जाणा–या, स्वतःचे वेगळेपण टिकविणा–या आहेत.  स्त्रीमुक्तीच्या, आक्रास्ताळया कल्पना त्या डोक्यात घेत नाहीत.  त्या समंजस, सुजाण आहेत. पुरुषांना त्यांच्या दोशासकट त्या स्वीकारतात, क्षमा करतात, तसेच वेळप्रसंगी ठणकावतात.  म्हणूनच मुक्तीतील वृंदा मोठया मनाने आक्रमक, आगाउ हरीषला माफ करते.  मुक्ती या कथेत आधुनिक स्त्रीचे खरे स्वरुप दिसून येते, असे म्हणता येईल.  मुक्तीमधील वृंदा शिकलेली, कमावती, स्वतंत्र विचाराची मुक्त स्त्री, पुरुषांशिवाय आयुश्यात सुरक्षितता मिळत नाही. हे तिला पटत नाही. स्त्रीच्या आयुष्याची वेल पुरुषी वृक्षाच्या आधारानेच वाढते. ही कुजकर, पुरुषी अहंकाराला जोपासणारी व स्त्रीची निर्माणक्षमता खर्ची करणारी संस्कृती तिला जोपासायची नाही. म्हणून केवळ एक रीत म्हणून आपल्या आयुष्याचा केंद्रबिंदू म्हणून एखाद्या पुरुषाला जबरदस्तीने कां स्वीकारावे ? असा तिचा प्रश्न आहे. पण ती पुरुषद्वेष्टी व लग्नविरोधी नाही.

***भारत सारणे :–***

जुन्या मिथ्स्चा आधारा घेवून त्यात नवीन अर्थ भरण्याचा सारणे यांच्या काही कगितून दिसतो.  'चिरदाह' मध्ये सासणे यांनी स्त्री मनाचा वेध घेतला आहे.  बाहेरुन गंभीर पण आतून विकल, लढू इच्छिणारी पण प्रत्यक्षात मूकपणे सोसणारी अशी स्त्री या कथेत आहे.

मराठी कथेचा एकंदर विचार केला तर सन 1945 ते 1960 हा लघुकथेच्या भरभराठीचा काळ होता.  तो नंतर राहिला नाही. सध्या कादंबरीची भरभराट आहे.  मध्यमवर्गीय कथांचा भर ओसरला आहे.  मराठीत ग्रामीण, दलित, विनोदी, रहस्य, गूढ, पोलिसी असे अनेक कथा प्रकार आले.  त्यात विषयाचे वेगळेपण आहे पण त्याच्या मांडणीत फरक नाही.  दलित ग्रामीण कथेचा भर ओसरला आहे.  दिवाळी अंकात व काही मासिकात कथा दिसतात.  साधारण 1975 नंतरच्या कथांचा विचार केला तर त्यात अनेक विषय आलेले दिसतात.  भोवतालच्या राजकीय, सामाजिक, भ्रष्ट तणावपूर्ण जीवनाचं, बदलत्या कुटुंब व्यवस्थेचे, खेडयाचे, तेथील लोकांच्या मानसिकतेचे चित्रण त्यांच्या कथेतून आलेले आहे.

पण या काळातच स्त्रीकडे बघण्याचा एकंदर समाजाचा दृष्टिकोन बदललेला दिसतो.  विशेषतः 1985 नंतर झपाटयाने हा बदल झालेला दिसतो.  स्त्रीचे दुःख, हालअपेष्टा, अगतिकता, त्याग, अत्याचार, सासुरवास यांच्या चित्रणापेक्षा तिच्या विचारात, आचारात झालेला बदल कथेत चित्रित झाला आहे.  त्यात गेल्या दोन दशकता स्त्री कथाकारांनी स्त्रियांचे चित्रण वेगळया दृष्टीकोनातून केले आहे.  या काळातील कथेतून स्त्रीत्वाच्या सामर्थ्याचा अविश्कार अधिक प्रभावीपणे होताना दिसतो.  या कथांतील स्त्री स्वतःला शोधणारी आहे.  भोवतालच्या विश्वाच्या संदर्भत स्वतःला पाहून तटस्थपणे स्वतःचे मूल्यमापन करणारी आहे. वरवर पाहता ही स्त्री सामाजिक दृष्टीने व आर्थिक दृष्टीने बरीच स्वतंत्र आहे. पण तरीही या स्त्रीच्या वाटयाला येणारे एकाकीपण, त्याबरोबर जाणवणारी दुर्बलता आणि तिची होणारी उपेक्षा संपलेली नाही.  स्त्रीच्या वाटयाला येणा–या या एकाकीपणाचा, उपेक्षेचा, तिच्या दुबळेपणाचा खोलवर जावून वेध घेण्याचा प्रयत्न काही स्त्री कथाकारांनी घेतलेला दिसतो. उदा. कमल देसाई – रंग,  गौरी देशपांडे – कावळया – चिमणीची गोश्ट, सानिया – प्रतीती, प्रवाह, अंबिका सरकार – वीज, आशा बगे – वर्तुळ, नातं वगैरे.

या सर्व कथेतील स्त्रिया स्वतःचे घर, नोकरी, व्यवसाय याच परिघात वावरतात.  यांच्या कथेतील वातावरण मध्यमवर्गीय, सुस्थिर, सुखवस्तू असे आहे.  ग्रामीण–दलित कथेतील स्त्री गरीब, अत्याचारग्रस्त आहे. पण या स्त्रिया दबलेल्या, दीन नाहीत. तर या कथेत स्त्रीची एक जीवनदृष्टी, एक अनुभवविश्व साकार कले आहे.  स्त्री मनाच्या या विविध परी आणि विविध जीवनदृष्टी यांच्यामुळे या कथेतील स्त्री विषयक अनुभव अनेकपदरी व सूक्ष्म बनले आहेत.  आपल्या समाजात आपल्या कुटुंबात स्त्रीचे वावरणे, तिच्या स्त्रीत्वाचे अनेक समर्थ पैलू, तिचा आत्मविश्वास, स्वाभिमान आणि त्यामुळेच कधी कधी वाटयाला येणारी अपमानाची वेदना यांचे अतिशय गुंतागुतीचे आजूबाजूच्या माणसांना सांभाळून घेणारी, दुस–यांच्या अडीअडचणींना ओळखणारी स्त्री दिसून येते. एका अर्थी ही भारतीय स्त्रीची खरी रुपे आहेतत्र  आधुनिक, स्वतंत्र पण आत्मनिर्भर स्त्री जी संस्काराला, संसाराला आणि करीयरला महत्व देते.

# Publish Research Article
# International Level Multidisciplinary Research Journal
# For All Subjects

Dear Sir/Mam,

We invite unpublished research paper.Summary of Research Project,Theses,Books and Books Review of publication,you will be pleased to know that our journals are

## Associated and Indexed,India

- ✶ International Scientific Journal Consortium Scientific
- ✶ OPEN J-GATE

## Associated and Indexed,USA

- Google Scholar
- EBSCO
- DOAJ
- Index Copernicus
- Publication Index
- Academic Journal Database
- Contemporary Research Index
- Academic Paper Databse
- Digital Journals Database
- Current Index to Scholarly Journals
- Elite Scientific Journal Archive
- Directory Of Academic Resources
- Scholar Journal Index
- Recent Science Index
- Scientific Resources Database

Indian Streams Research Journal
258/34 Raviwar Peth Solapur-413005,Maharashtra
Contact-9595359435
E-Mail-ayisrj@yahoo.in/ayisrj2011@gmail.com
Website : www.isrj.net